जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
इमेल.cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेसनोट **दिनांक ३१.०८.२०२५**

"बेकायदेशीररित्या अग्निशस्त्र बाळगणा-या आरोपीस अटक "

----------oooooooooo----------

दिनांक ३०/०८/२०२५ रोजी रोजी गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी चे पोशि/१९९७ इंगळे यांना माहिती मिळाली की, अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नफीस उर्फ तोतला हा शांतीनगर पाईपलाईन रोड येथे आपल्या कब्जात अवैधरीत्या अग्निशस्त्र बाळगुन फिरत आहे'' सदर मिळालेल्या माहिती वरून गुन्हे शाखा, घटक-२ भिवंडी चे वपोनि/जनार्दन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/भाईर व त्यांच्या पोलीस पथकाने सदर ठिकाणी सापळा लावून भादवडनाका कडुन बिलालनगरकडे जाणाऱ्या पाईपलाईन रोडवर, ट्रान्सफार्मरजवळ, भिवंडी या ठिकाणी आरोपी नफीस उर्फ तोतला दिलावर खान, वय २३ वर्षे, रा.शांतीनगर, भिवंडी यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडुन ०१ माऊझर पिस्टल (अग्निशस्त्र) व ०२ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आले.

सदर प्रकाराबाबत आरोपीविरूद्ध शांतीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. । १००९/२०२५, शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलिस अधिनीयम चे कलम ३७ (१), १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व श्री.शेखर बागडे, स.पो.आ., गुन्हे शोध-१, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-२ भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/जनार्दन सोनवणे, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी. पाटील, सपोउनि/सुधाकर चौधरी, पोहवा/बोरसे, पोहवा/राणे, पोहवा/पाटील, पोहवा/घाग, मपोहवा/डोंगरे, पोशि/इंगळे, पोशि/घरत व पोशि/कुंभार यांनी पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर